# वसंतराव नाईक शेतीमित्र २०१३

## श्री. हेमंत अंकुश सावंत

### ३०२/स्वप्नसुधा, मु.पो.हुंबरट, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग



३४

- सिंधुदुर्ग जिल्हयातील प्रगतीशिल शेतकरी, स्वतः एम.एस.सी (कृषि), एकूण ०.७२ हे. शेतजमिन व काजूची लागवड.
- राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत पॅकहाऊसची उभारणी व शेतकरी मासिक, बळीराजा व दै.अॅग्रोवनचे नियमीत वाचक.
- विविध मेळावे, चर्चासत्र, शेतकरी सहल, कृषिप्रदर्शन यातून शेतीविषयक माहिती/योजना, शेतक-यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य.
- दैनिक प्रहारमधून ‘फेरफटका’ या सदरातून कृषी विषयक लेखन.
- व्हॅनिला – हिरवे सोने ही कृषी मार्गदर्शिका प्रसिध्द.
- लोकप्रतिनिधी/अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करुन शेतक-यांचे प्रश्नांबाबत त्यांना न्याय व आर्थिक मदत मिळवून देण्याचे कार्य.
- अनेक शेतक-यांच्या यशोगाथा व कोरडवाहू शेती संदर्भात लेख वृत्तपत्रातून प्रसिध्द.

# वसंतराव नाईक शेतीमित्र २०१३

## श्री.बाळकृष्ण पौलाद पाटील

### मु.पो. गणपूर, ता.चोपडा, जि. जळगाव



- प्रगतीशिल शेतक-यांच्या शेतीला भेटी देऊन त्यांच्या यशोगाथांना दैनिक सकाळमधून प्रसिध्दी.
- चोपडा तालुका सहकारी साखर कारखानाच्या माध्यमातून व कृषि विभागाच्या सहकार्याने ऊस उत्पादकता कार्यक्रमात ऊस विस्तारक म्हणून मागील पाच वर्षापासून कार्यरत.
- एकात्मिक पीक व्यवस्थापनासाठी नेहमी प्रयत्नशील राहून कापूस व ऊस पिकांच्या शेतीशाळेमध्ये सहभागी होऊन इतर शेतक-यांना मार्गदर्शन.
- राज्यासह देशातील विविध कृषि प्रदर्शनाना भेटी देऊन शेतीच्या यांत्रीकरणावर भर व कृषि विद्यापीठाच्या तज्ज्ञांचा सल्ला घेऊन पीक पध्दतीचा अवलंब.
- शेतीस जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय
- सकाळ वृत्तपत्रात सन १९९१ पासून बातमीदार व या माध्यमातून शेतीच्या विविध तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार.

३५

# वसंतराव नाईक शेतीमित्र २०१३

## श्री.ज्ञानेश्वर श्रीरंग रायते

### मु.पो. भवानीपूर, ता. इंदापूर, जि. पुणे



- जिल्हयातील प्रगतीशिल शेतकरी व छंद म्हणून पत्रकारीता.
- सकाळमध्ये शेतक-यांसाठी कृषि क्षेत्रातील विपुल लेखन तसेच क्षारपड जमीनीसाठी भूमीगत निचरा प्रणाली संदर्भातील विशेष लिखाण
- पाचट न जाळण्यासाठी कृषि विज्ञान केंद्राच्या तज्ज्ञांच्या माध्यमातून तसेच कृषि विभागामार्फत मूलस्थानी जलसंधारणाच्या मोहिमेबाबत जनजागृती
- ग्रामस्वच्छतेसाठी प्रोत्साहानात्मक लेखन व सामाजिक दृष्टीकोन मनात ठेवून जलसंवर्धन, पर्यावरण, दुष्काळी परिस्थितीत नाला सरळीकरणासाठी नागरिकांची मानसिकता तयार करणे व विद्यार्थ्यांसाठी कृषि करिअरबाबत बातम्या देणे इत्यादी कामे.
- महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांचा उत्कृष्ट पत्रकारीता पुरस्कार तसेच महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या महात्मा गांधी तंटामुक्त गांव म्हणून उत्कृष्ट पत्रकारीतेच्या विभागीय पुरस्काराने सन्मानित

३६

# वसंतराव नाईक शेतीमित्र २०१३

## श्री. अशोक दगडू तुपे

### मु.पो. कान्हेगाव, ता. श्रीरामपूर, जि.अहमदनगर



३७

- एकूण २.२९ हे. शेतजमिन, जोडओळ पध्दतीने ऊस लागवड करीत असून ठिबक सिंचनाव्दारे सिंचन व खत व्यवस्थापन.
- लोकसत्ता दैनिकाचे वार्ताहार व दैनिक सार्वमतचे उपसंपादक म्हणून कार्यरत.
- वृत्तपत्रातुन ठिबक तंत्रज्ञान, कृषि वित्तपुरवठा, शेती, सहकार व जलसंधारण या विषयांवर विशेष लिखाण.
- महात्मा फुले राज्यस्तरीय पत्रकारिता गौरव पुरस्कार व शब्दगंध साहित्य पुरस्काराने सन्मानित.
- सामाजिक कार्याची आवड, तंटामुक्त समितीचे सदस्य म्हणून कार्यरत.

# वसंतराव नाईक शेतीमित्र २०१३

## श्री. अमोल जयवंत जाधव

### मु.गोंदी, पो.शेरे, ता. कराड, जि. सातारा



- कृषि विषयातील तांत्रिक ज्ञानाचा अभ्यास करुन पत्रकारीतेच्या माध्यमातून विविध विषयावरील लेखांना प्रमुख वृत्तपत्रातून प्रसिध्दी
- शेतक-यांच्या समवेत राहून अधिक उत्पादनाचे यशस्वी प्रयोग व कृषि विद्यापीठे, कृषि प्रतिष्ठान व विविध कृषी विषयक संस्थांना भेटी देऊन तेथील तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याबाबत शेतक-यांना प्रवृत्त करण्याचा प्रयत्न.
- कृषि मालावर प्रक्रिया व निर्यात या संदर्भामधील लिखाण प्रसिध्द
- ॲग्रोवनमधील लेखांव्दारे कृषि तंत्रज्ञानाची माहिती अनेकांपावेतो पोहचवली असून शेतक-यांना त्याचा उत्पादन वाढीसाठी फायदा
- प्रयोगशील शेतक-यांच्या यशोगाथांना ॲग्रोवन दैनिकामधून सन २०१० पासून प्रसिध्दी.

३८

# वसंतराव नाईक शेतीमित्र २०१३

## श्री. चेतन मुकुंदराव भैरम

### १०, न्यु गुजराती कॉलनी, भंडारा



- उच्चशिक्षीत असून पुर्णवेळ पत्रकारीता करत असल्याने अनेक शेतक-यांच्या यशोगाथांना वृत्तपत्रातून प्रसिध्दी.
- दै. देशोन्नती मधून कोरडवाहू तंत्रज्ञान, जरबेरा, वांगी, भेंडी, वेलवर्गीय पिके, सोयाबीन, मिरची, तूर, सेंद्रिय शेती इत्यादीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे लेख प्रसिध्द
- जलसंधारण, शेततळी इत्यादी कार्यक्रमावर लिखाण करुन त्याचे महत्व शेतक-यांना पटवून दिले
- जिल्हा परिषद भंडारामार्फत त्यांच्या कार्याबद्दल अभिनंदनाचा ठराव करुन गौरव
- सामाजिक कार्याची आवड असून रक्तदान शिबीर, वाहतूक सुरक्षा, निबंध स्पर्धा, तंटामुक्ती अभियानामध्ये स्वतः सहभागी
- साकोली कृषि संशोधन केंद्रास सातत्याने भेटी देऊन व कार्यक्रमात सहभाग नोंदवून आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेऊन शेतक-यांना मार्गदर्शन.

# वसंतराव नाईक शेतीमित्र २०१३

## श्री. सदाशिव ऊर्फ सयाजीराव गोपाळराव पोखरकर

### मु.पो. कोतुळ, ता.अकोले, जि. अहमदनगर



- दैनिक सकाळ, गावकरी, ॲग्रोवन, बळीराजा. इ. वृत्तपत्रातून शेतीविषयक लेख व बातम्या प्रसारित.
- शेती व शेतकरी यांच्यासाठी अविरत प्रबोधन आणि मार्गदर्शन.
- शेतापर्यंत व्यक्तीगत भेटीचे आयोजन, ग्रामीण भागात सहकारी दुध संस्था, पतसंस्था यांचे माध्यमातून समाजकार्य.
- ईस्त्रायल व जॉईन या देशांचा कृषि विषयक अभ्यासदौरा.
- अनेक यशस्वी शेतक-यांच्या यशोगाथा, शेतीविषयक लेख, पिकपध्दती याबाबतचे उत्कृष्ठ बातमीदार म्हणून नावलौकिक.
- शेती व शेतकरी यांच्यासाठी अविरत झटणारा कार्यकर्ता अशी प्रतिमा.

४०